ना नफा! ना तोटा!
पशुखाद्य
गौ माता भोजन ५ कि. गुळ पावडर बॅग
200/– रुपये मात्र
हळद २८० रू. किलो, खोबरे १४० रू. किलो
सागर ड्रायफ्रुट
पत्ता : व्ही.के.चौधरी मार्केट, हॉटेल शेरे पंजाब समोर, पाचकंदिल, धुळे (मो.९३७११९२०००/९६८९०४३५५१)

# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६७ ■ अंक क्र.१८६ ■ गुरुवार ११ एप्रिल २०२४ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.No./DHL/53/24-26

आकर्षक लग्न पत्रिका
उत्तम क्वॉलिटी व उत्कृष्ट दर्जेची लग्न पत्रिका प्रिंटींग सह तसेच गिफ्ट पाकीट व फॅन्सी कार्ड शिट होलसेल भावात मिळण्याचे एकमेव ठिकाण
श्रीहरि पेपर प्रॉडक्टस्
"कार्ड हाऊस", गल्ली नं.५, धुळे
मो.94239 28900

आम्ही तुमची माफी स्वीकारणार नाही, कारवाईला सामोरे जा!

## बाबा रामदेव यांचा माफीनामा सर्वोच्च न्यायालयाने फेटाळला



**नवी दिल्ली, दि.१०– दिशाभूल जाहिरातीच्या प्रकरणावरून पतंजली आयुर्वेदाचे व्यवस्थापकीय संचालक आचार्य बाळकृष्ण आणि बाबा रामदेव यांना आज सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा फटकारले आहे. दिशाभूल जाहिरातीच्या प्रकरणात बाबा रामदेव आणि आचार्य बाळकृष्ण यांचा दुसरा माफीनामा सर्वोच्च न्यायालयाने फेटाळला.**

या प्रकरणाची बुधवारी न्यायालयात सुनावणी पार पडली. यावेळी न्यायमूर्ती हिमा कोहली आणि न्यायमूर्ती अमानतुल्ला यांच्या खंडपीठासमोर पतंजलीची बाजू वकील विपिन सांघी आणि मुकुल रोहतगी यांनी मांडली. यावेळी न्यायलयाने म्हटले की, तुम्ही न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन केले असून कारवाईला सामोरे जा. याआधी २ एप्रिलला झालेल्या सुनावणीवेळी पतंजलीच्यावतीने माफीनामा सादर करण्यात आला होता. यावरुन न्यायालयाने पतंजलीला फटकारले होते. तसेच सुनावणीची पुढील तारीख दिली होती. यानुसार आज सुनावणी पार पडली. मात्र, या सुनावणीच्या आधीच एक दिवस म्हणजे ९ एप्रिलला पतंजली आयुर्वेदाचे व्यवस्थापकीय संचालक आचार्य बाळकृष्ण आणि बाबा रामदेव यांनी पुन्हा (पान ४ वर)

### विनम्र अभिवादन



क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!
– संपादक, दै.आपला महाराष्ट्र

### देशभरात रमजान ईदचा उत्साह

नवी दिल्ली, दि.१०– बुधवारी चंद्रदर्शन झाल्याने गुरुवारी दि.११ रोजी देशभरात रमजान ईद साजरी होत आहे. महिनाभराचे कडक उपवासाची सांगता चंद्रदर्शनाने झाली. मुस्लिम बांधवांनी एकमेकांना शुभेच्छा देत ईदला प्रारंभ केला आहे.

## संविधान वाचवण्यासाठी भाजपचा पराभव आवश्यक अॅड.गोवाल पाडवींचे कार्यकर्ता मेळाव्यात आवाहन



**शिरपूर दि.१० (का.प्र.)– २०१३ नंतर देशातील महिलांवरील अत्याचारात ३२ टक्के वाढ झाली आहे. ७५ वर्षात साडेचारशे रुपयांपर्यंत पोहचलेले गॅस सिलेंडर अवघ्या दहा वर्षात एक हजारांपेक्षा अधिकने महागले. महागाई प्रचंड वाढली आणि वर भाजप मोदी की गॅरंटी देतेय. म्हणजे सामान्य माणूस पुरता नेस्तनाबूत करायचा आहे का? संविधन, आदिवासींचे अस्तित्व वाचवण्यासाठी मी उमेदवारी करीत असून भाजपचा पराभव मतदारांनी करावा असे आवाहन नंदुरबार लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार अॅड. गोवाल पाडवी यांनी केले.**

महाविकास आघाडीच्या घटक पक्षांचा मेळावा दहा एप्रिलला येथील विठ्ठल लॉन्समध्ये घेण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. आमदार अॅड.के.सी.पाडवी अध्यक्षस्थानी होते. प्रतिभा शिंदे, मनीषा पाटील, मालती वळवी, कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष मनोहर पाटील, आदिवासी आघाडीचे जिल्हाध्यक्ष रमेश (पान ४ वर)

### नाना पटोलेंच्या वाहनाला अपघात


भंडारा, दि.१०– महाराष्ट्र कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या वाहनाला भंडारा शहरालगतच्या भीलवाडा गाव–ाजवळ काल रात्री अपघात झाला. प्रचार आटोपून सुकळी गावी जात असताना मागून येणाऱ्या ट्रकने धडक दिली. यात सुदैवाने कुणालाही इजा झाली नाही. भंडारा शहरालगतच्या भीलवाडा गावाजवळ ही घटना घडली आहे. मंगळवारी रात्रीच्या सुमारास प्रचार आटोपून सुकळी या गावी जात असताना मागून येणाऱ्या ट्रकने त्याच्या गाडीला जोराची धडक दिली. या अपघातामध्ये गाडीचे मोठे नुकसान झाले असून नाना पटोले थोडक्यात बचावले आहेत.

**घातपाताचा डाव होता का?**

अपघातावरुन कॉंग्रेसने भाजपवर गंभीर आरोप केले आहेत. विरोधी (पान ४ वर)

## एकाच दिवशी शेकडो ग्रामपंचायतींमध्ये मतदानाचा जागर चार लाखापेक्षा जास्त मतदारांनी घेतली मतदानाची प्रतिज्ञा

**धुळे, दि.१०–लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुका म्हणजे लोकशाहीचा महोत्सव असून तो देशभर सुरू आहे. या निवडणुकीत आपल्या मतदानाचा हक्क प्रत्येक मतदाराने बजवावा. यासाठी मी मतदान करणार... आपणही मतदान करा, असे आवाहन करीत धुळे जिल्ह्यातील ५८६ ग्रामपंचायतींत एकाच दिवशी व एकाचवेळी मतदार जनजागृती महारॅली उत्साहात संपन्न झाली.**



यावेळी राबविण्यात आलेल्या विविध जनजागृती उपक्रमांत जिल्ह्यातील ४ लाखांपेक्षा जास्त मतदारांनी मतदानाची प्रतिज्ञा घेतली. तर अडीच लाखापेक्षा जास्त मतदारांनी मी मतदान करणार असे संकल्प पत्र भरुन घेण्यात आले त्याचबरोबर १ लाख ५४ हजार ६११ मतदारांनी व्होटर हेल्पलाईन अॅप डाऊनलोड केले असून या उपक्रमांच्या माध्यमातून जिल्ह्याभरातील १४ लाख ४ हजार ४९० मतदारांची जनजागृती करण्यात आली. अशी माहिती उपमुख्य कार्यकारी अधिकारी तथा स्वीप उपक्रमाचे (जिल्हा परिषद) नोडल अधिकारी भाऊसाहेब अकलाडे यांनी दिली आहे.

लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी धुळे मतदार संघात २० मे रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकीत जिल्ह्यातील जास्तीत जास्त मतदारांनी मतदानाचा हक्क बजवावा याकरीता जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अभिनव गोयल यांच्या मार्गदर्शनाखाली मस्वीपफ उपक्रमांतर्गत विविध कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून धुळे जिल्हा परिषदेच्यावतीने मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांच्या संकल्पनेतून ८ एप्रिल या दिवशी जिल्ह्यातील ५८६ ग्रामपंचायतींमध्ये एकाचवेळी (सकाळी ८ ते १०) मतदार जनजागृती महारॅली काढण्यात आली. या रॅलीस जिल्ह्यातील नागरीक, मतदार यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ही जनजागृती महारॅली यशस्वी करण्यासाठी जिल्हा परिषद, महसुल विभाग, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, महिला बाल कल्याण विभाग, आरोग्य विभाग, शिक्षण विभाग, तसेच पंचायत समिती व ग्रामपंचायतीनी सहभाग घेतला. ही मतदार जनजागृती महारॅली यशस्वी करण्यासाठी प्रत्येक गावातील पंचायत समितीस्तरावर संपर्क अधिकारी नेमण्यात आले होते. त्यांना मदतीसाठी बुथस्तरीय अधिकारी, ग्रामसेवक, शिक्षण, अंगणवाडी सेविका, आशा सेविका, महिला बचतगट प्रतिनिधी, तलाठी यांची मदत घेण्यात आली. प्रत्येक (पान ४ वर)

### एल.सी.बी. पीआय दत्तात्रय शिंदेंना जामीन मंजूर

**धुळे, दि.१०– एल.सी.बी. चे पोलीस निरीक्षक व दोन पोलीस कर्मचारी यांना लाच घेतल्या प्रकरणी आज जामीन मिळाला आहे.**

याबाबतची अधिक माहिती अशी की, एल.सी.बी. पी.आय. दत्तात्रय शिंदे, कर्मचारी अशोक पाटील, नितीन मोहने यांना दिड लाख रुपयांची लाच घेतल्याप्रकरणी एक एप्रिल रोजी अटक करण्यात आली होती. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कारवाईनंतर तिघांना पोलीस कोठडी व नंतर न्यायालयीन कोठडी मिळाली होती. ८ एप्रिल रोजी न्यायमूर्ती श्री.पुलाटे साहेब यांच्या न्यायालयात (पान ४ वर)

## धुळे लोकसभा मतदार संघातून कॉंग्रेसतर्फे डॉ.शोभा बच्छाव

**मुंबई, दि.१०– लोकसभा निवडणूकीच्या अनुषंगाने कॉंग्रेसच्या वतीने धुळे आणि जालना या दोन लोकसभा मतदारसंघातील उमेदवारी जाहीर केली असून धुळ्यातून जिल्ह्याच्या माजी पालकमंत्री डॉ.शोभा बच्छाव तर जालना लोकसभा मतदारसंघात डॉ. कल्याण काळे यांना उमेदवारी दिली आहे.**



धुळ्यामध्ये आता महायुतीचे उमेदवार डॉ.सुभाष भामरे विरुद्ध डॉ.शोभा बच्छाव अशी लढत होणार आहे. तर जालना लोकसभेत रावसाहेब दानवे विरुद्ध डॉ.कल्याण काळे असा सामना रंगणार आहे. कॉंग्रेसतर्फे धुळे ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे आमदार कुणाल पाटील यांचे नाव चर्चेत होते, परंतु त्यांनी निवडणूक लढविण्यास नकार दिल्याने डॉ.शोभा बच्छाव यांना कॉंग्रेसने निवडणुकीच्या रिंगणात उतरवले आहे. धुळे लोकसभा मतदारसंघात नाशिक जिल्ह्यातील तीन विधानसभा मतदारसंघाचा समावेश होतो. (पान २ वर)

### गुप्तांगावर मारल्याने तरुणाचा मृत्यू

नंदुरबार, दि.१० (प्रतिनिधी)– शाब्दिक वादातून हाणामारी झाली अशातच गुप्तांगावर जोरात मारल्याने युवकाचा जागीच मृत्यू झाल्याने खळबळ उडाली असून या खून प्रकरणी (गणेश बुधावल ता.तळोदा) येथील एका विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. ही घटना आठ एप्रिल रोजी रात्री बारा वाजेच्या सुमारास घडली. कुसुमबाई पाडवी यांनी तळोदा पोलिसात फिर्याद दिली असून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कुशल चौधरी (वय १७) हा ताडी विक्रेता असल्याने त्याच्या घरी अनिल केलुसिंग पाडवी याने ताडीची मागणी केली. यावर कुशल म्हणाला, (पान ४ वर)

## भविष्यातील पाणीटंचाई पाहता जलसंवर्धनाचे नियोजन करून पीक पद्धती स्वीकारा : कृउबा सभापती पाटील

**शहादा, दि.१० (प्रतिनिधी) – तालुक्यात गेल्या वर्षी झालेल्या अल्प पावसामुळे अनेक बोरवेल्सची पाण्याची पातळी खालावली आहे तर अनेक बोरवेल्स कोरडेठाक झाले आहेत. परिणामी बागायती शेती धोक्यात आली आहे. तालुक्यात येणाऱ्या काळात पाणी टंचाई परिस्थितीचा सामना करावा लागू नये यासाठी शेतकरी बांधवांनी येणाऱ्या खरीप हंगामात विचार पूर्वक पीक पद्धती स्वीकारावी व आर्थिक नियोजन करावे. भविष्यात परिसरातील शेतकरी जल संवर्धन आणी शेतीचे योग्य नियोजन करतील असा आशावाद गंगोत्री फाउंडेशनचे अध्यक्ष तथा तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अभिजीत पाटील यांनी व्यक्त केला.**



शहरातील (कै.) डॉ.विश्राम काका पाटील शैक्षणिक संकुलाचा आवारात भविष्यातील पाणीटंचाई पाहता जलसंवर्धन आणि शेतीचे योग्य नियोजन करण्याविषयी शेतकऱ्यांची बैठक घेण्यात आली. (पान ४ वर)

## जिल्ह्यात ५० लक्ष वृक्ष लागवडीसाठी यंत्रणेने सुक्ष्म नियोजन करावे : जिल्हाधिकारी अभिनव गोयल

**धुळे, दि.१०– सन २०२४ यावर्षांकरीता धुळे जिल्ह्यात पावसाळ्यात ५० लक्ष वृक्ष लागवडीचा कार्यक्रम निश्चित करण्यात आला आहे. त्यानुसार सर्व विभागांनी वृक्ष लागवडीचे सुक्ष्म नियोजन करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी दिल्यात.**

वृक्ष लागवड कार्यकमातंर्गत नवीन नियोजन सभागृहात जिल्हाधिकारी श्री.गोयल यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. यावेळी ते बोलत होते. बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे, उपवनसंरक्षक नितिनकुमार सिंग, उपजिल्हाधिकारी (रोहयो) नितीनकुमार मुंडावरे, विभागीय वन अधिकारी गजानन सानप आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी गोयल म्हणाले की, धुळे जिल्ह्यात यावर्षी पावसाळयात ५० लक्ष वृक्ष लागवडीचा कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. त्यानुसार जून महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात पावसाचा अदांज घेवून प्रत्येक विभागनिहाय वाटप करण्यात आलेले वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट पूर्ण करावेत. वृक्ष लागवडीसाठी प्रत्येक विभागाने अक्षांश व रेखांश पद्धतीने जागेची निश्चिती करावी. वृक्षारोपणासाठी उंच, कमीत कमी दीड ते दोन वर्ष वयाची दर्जेदार व गुणवत्तापूर्ण आणि पाण्याची उपलब्धता, हवामान, भौगोलिक परिस्थितीशी अनुरुप परंतु स्थानिक प्रजातीच्या रोपांची उपलब्धता करावी. यासाठी एकंदर ६० लक्ष रोपे तयार करण्यासाठी वन विभाग, सामाजिक वनीकरण विभागामार्फत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना आणि इतर योजनांतर्गत निधीतून रोपवाटीका विकसित करण्याचे नियोजन करावे. त्याचबरोबर कृषी, जलसंपदा, सार्वजनिक बांधकाम, आदिवासी विकास विभाग, ग्रामपंचायत व अन्य विभागामार्फत मनरेगा व इतर उपलब्ध निधीतून रोपवाटिका सुरु करण्याबाबत आणि रोपांची उपलब्धता करण्याची कार्यवाही करावी.

वृक्षारोपण करतांना मियावाकी पद्धतीचा वापर करावा. मियावाकी पद्धतीने वृक्ष लागवडीसाठी गाव तेथे मियावाकी, ग्रामपंचायत, गायरान जमीन, पडीक जमीन, सरकारी शाळा, खाजगी शाळा, महाविद्यालय, आश्रमशाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र, महापालिका, नगरपालिकेच्या मोकळ्या जागेचा वापर करावा. त्याचप्रमाणे वृक्ष लागवडीसाठी प्रत्येक गावात बिहार पॅर्टन, अकोला पॅटर्न, कन्या वन समृद्धी योजनाच्या माध्यमातून वृक्षारोपन करावे, बांबु लागवडीसाठी तसेच कृषी विभागाने मनरेगा अंतर्गत तसेच विविध योजनेतंर्गत शेतकऱ्यांना फळबाग लागवड करण्यासाठी (पान ४ वर)



## महाराष्ट्रातून गांजा तस्करी करणाऱ्या तिघांना मध्यप्रदेश पोलिसांनी पकडले

**धुळे, दि.१०– महाराष्ट्रातून सतरा लाख चाळीस हजाराचा बावन्न किलो गांजा इको गाडीतून घेवून जाणाऱ्या तिघांना सेंधवा पोलिसांनी पकडले आहे. यामधील तिघे शिरपूर तालुक्यातील सांगवी पोलीस ठाण्या अंतर्गत येणाऱ्या निलगिरी पाडा येथील रहिवासी आहेत.**

बडवानीचे पोलीस अधीक्षक पुनीत गेहलोत यांनी आदर्श आचारसंहिता लक्षात घेता मध्यप्रदेश व महाराष्ट्र सीमेवर अवैध दारु, गोमास, हत्यारे, मादक पदार्थ तस्करीवर आळा बसावा म्हणून ऑपरेशन प्रहार अंतर्गत तपासणी सुरु केली होती. पोलीस अधीक्षक यांना गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीनुसार एम.पी.०९/डी.डी. ३३३८ या ईको कारची वाट पोलीस पहात होते. सदर गाडी महाराष्ट्रातून बिजासनी नाक्यावर आली असता कसून शोध घेण्यात आला. यावेळी तीन प्लास्टीकच्या पोत्यांमध्ये ५२ किलो गांजा मिळून आला. गाडीमधील तिघांना अटक करण्यात आली. यामध्ये बावन्न किलो गांजा, दहा लाख चाळीस हजाराचा (पान ४ वर)

## शहादा पोलिसांनी ट्रकसह पकडली त्रेचाळीस लाखांची दारु

**शहादा, दि.१० (का.प्र.)– गोवा राज्यात निर्मित दारूची बनावट कागदपत्राद्वारे अवैध वाहतूक करणारी सुमारे दहा लाख रुपये किंमतीची मालट्रक व ३३ लाख साठ हजार रुपये किंमतीची विदेशी विस्की असा एकूण ४३ लाख ७० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल शहादा पोलिसांनी जप्त केला असून दोन आरोपींना ताब्यात घेतले आहे. विशेष म्हणजे अहमदनगर येथून शहादा येथील एका मेडिकल दुकानाच्या नावे बनावट बिल बनवून सदर मद्यसाठा शहादा येथे आणला जात होता.**



शहादा–दोंडाईचा रस्त्यावरील पोलीस स्टेशन समोरील तात्पूरत्या चेक नाक्यावर टाटा कंपनीची माल–वाहु ट्रक क्र.एमएच ०४ एलक्यु ५९६२ ची नाकाबंदी दरम्यान बुधवार दि.१०रोजी सकाळी साडेसात वाजेच्या सुमारास पोलिसांनी तपासणी केली. त्यात संशयास्पद कागदपत्रे आढळून आली. याबाबत चालकासह त्याच्या साथीदारांना पोलिसांनी विचारणा केली.उडवा उडवीची उत्तरे दिल्यानंतर पोलिसांनी सदर ट्रक पोलीस ठाण्याला आणला. तेथे तपासणी दरम्यान गोवा राज्यात निर्मित विदेशी दारूचा मोठ्या प्रमाणात साठा आढळून आला. पोलिसांना सदर ट्रक मध्ये गोवा राज्यात निर्मित रॉयल ब्ल्यू माल्ट व्हिस्कीचे एकूण ५०० बॉक्स आढळून आले. प्रत्येक बॉक्समध्ये १८० च्या ४८ बॉटल्स अशा एकूण २३ हजार बॉटल्स पोलीस साठी जप्त केल्या.तसेच ५००० रु.चा एक व्हिवो कंपनीचा काळ्या रंगाचा ड्युएल सिम मोबाईल ५००० रु.कि.चा एक रिअल मी कंपनीचा सिल्व्हर रंगाचा ड्युएल सिम मोबाईल व १०,००,००० रु. कि.ची एक पांढऱ्या रंगाची बंद बॉडीची टाटा कंपनीची मालवाहु गाडी असा एकूण ४३ लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी शहादा पोलिसात पोलीस (पान ४ वर)

### तापमान चाळीशी पार

धुळे, दि.१०– शहराचे तापमान चाळीशी पार गेले आहे.बुधवारी शहरात तापमानाचा पारा ४१ अंशाच्या पुढे सरकला. उन्हामुळे रस्ते दुपारी निर्मणुष्य होत आहेत. रात्री देखील झळा अनुभवास येत आहेत.

## ईपीएस ९५ संघर्ष समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष कमांडर राऊत उद्या धुळ्यात

**धुळे, दि.१०– ईपीएस ९५ राष्ट्रीय संघर्ष समितीच्या दिल्ली येथील तीस मार्चच्या केंद्रीय कार्यकारी समितीच्या सभेत देशभरातील विविध राज्यांतील प्रतिनिधींनी आपला सहभाग नोंदविला. त्यात झालेल्या निर्णयानुसार व लोकसभा निवडणुकीत आपल्याला बजवावी लागणारी भुमिका या संदर्भात राष्ट्रीय संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष कमांडर अशोक राऊत हे धुळे व नंदुरबार जिल्हा भेटीसाठी येत असून खा.डॉ.सुभाष भामरे यांची शिष्टमंडळासह ते भेट घेणार आहेत, अशी माहिती जिल्हाध्यक्ष देवीसिंग जाधव यांनी दिली.**



पेन्शन प्रश्न सोडविण्यासाठी संघटनेने अनेक आंदोलने करुनही केंद्र सरकारने हा प्रश्न प्रलंबित ठेवलेला आहे. या संदर्भात राष्ट्रीय संघर्ष समिती संघटनेस बहुमोल मार्गदर्शन व योगदान दिले आहे, त्यांना आपण निवडणुकीत मदत करावी या भुमिकेतून खासदार डॉ. सुभाष भामरे यांची भेट निश्चित केली असून दि.१२ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वा.राम पॅलेस, पारोळा रोड येथील खासदार कार्यालयात सदर भेटीचे आयोजन केले आहे. सदर भेटीसाठी कमांडर राऊत यांच्या सोबत राष्ट्रीय महासचिव इंजि.विरेंद्र सिंह राजावत, राष्ट्रीय सल्लागार डॉ. पी.एन. पाटील, राष्ट्रीय महिला आघाडी अध्यक्षा श्रीमती शोभाताई आरास, राष्ट्रीय कोषाध्यक्ष बी.एस. नारखेडे, पश्चिम भारत संघटक सरिताताई नारखेडे, पश्चिम भारत क्षेत्र संघटक सुभाषराव पोखरकर यांची देखील उपस्थिती लाभणार आहे. यानंतर दि.१३ रोजी नंदुरबार जिल्हयाच्या खासदार डॉ.हिनाताई गावीत यांची भेट सकाळी त्यांच्या नंदुरबार येथील विमलविहार सोसायटीच्या खासदार कार्यालयात आयोजित केली आहे. दोन्ही जिल्ह्यांतील पेन्शनर बांधवांनी याप्रसंगी मोठ्या संख्येने उपस्थित (पान ४ वर)

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -66,250 रु.+3% GST
सोने- 24 K -72,200 रु.+3% GST
चांदी- 84,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३




## चेट्रीचंड्र निमित्त सिंधी समाज युवा मंचतर्फे रक्तदान शिबिर

**नंदुरबार, दि.१० (प्रतिनिधी) – सिंधी दिवस चेट्रीचंड्र निमित्त गुरु जो दर येथे सिंधी युवा मंचतर्फे आयोजित रक्तदान शिबिरात १९३ रक्तदात्यांनी रक्तदान केले. त्यात महिलांच्या सहभाग उत्स्फूर्त व उल्लेखनीय होता.**

रक्तदानसाठी सिंधी समाज युवा मंचचे अध्यक्ष संजय मंगलाणी व सदस्य तसेच इतर समाज बांधवांनी सहकार्य केले शिबिराची सुरुवात श्री झुलेलाल महाराज यांच्यासह देवताच्या पूजन व आरतीने रक्तदान शिबिराला सुरुवात (पान ४ वर)

## ६ वे पुण्यस्मरण



**स्व.प्रशांत पुनमचंद राठोड**
(राणा ट्रान्सपोर्ट)

**सरले जिवन विरले दर्शन उरल्या केवळ स्मृती**
**व्याकुळ नेत्र आज आपणास श्रध्दांजली अर्पिती**

...शोकाकुल...
श्रीमती वर्षा प्रशांत राठोड (पत्नी)
पुनमचंद सुखलाल राठोड (वडील) सौ.पुष्पाबाई पुनमचंद राठोड(आई)
नितीन पुनमचंद राठोड (भाऊ) सौ.राखी नितीन राठोड
प्रविण पुनमचंद राठोड (भाऊ) सौ.दिक्षा प्रविण राठोड
सुशिल पुनमचंद राठोड (भाऊ) सौ.भावना सुशिल राठोड
प्रकाश गोविंद सानंदा (पाहुणे) सौ.भारती प्रकाश सानंदा(बहीण)
मिथीलेश, कनवेश (मुले), हितेश, दिव्येश, यज्ञेश (पुतणे)
सुनेरी, सृष्टी (पुतणी), तेजस, सुजल (भाचे)

**एकनाथ विजय व्यायाम शाळा, धुळे.**
**क्रांतीवीर सुभाष मित्र मंडळ, धुळे.**
**व राडोड परिवार**




## दुचाकी घसरली; पती ठार तर पत्नी जखमी

**साक्री– तालुक्यातील छडवेल गावी भरधाव वेगाने जाणारी दुचाकी घसरल्याने घडलेल्या अपघातात दुचाकीस्वार जागीच ठार झाला तर मागे बसलेली त्याची पत्नी जखमी झाल्याची घटना दि.२ एप्रिल रोजी दुपारी एक वाजेच्या सुमारास घडली.**

याबाबत अधिक माहिती अशी की, देवळा जि.नाशिक येथील योगेश हिरामण बच्छाव (४५) हे त्यांची पतवी सुषमा योगेश बच्छाव (३३) हिच्यासोबत दि.२ रोजी दुपारी एक वाजेच्या सुमारास एमएच ४१ बीसी ४९४६ या ज्युपिटर गाडीने भरधाव वेगाने जात असतांना त्यांची दुचाकी स्लीप झाली. या अपघातात पती–पत्नी जखमी झाले. अतिरक्तस्त्राव झाल्याने त्यांना उपचारासाठी साक्री ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथून पुढे उपचारासाठी नाशिक येथील ग्लोबल हॉस्पीटल येथे दाखल केले असता तेथे त्यांच्यावर उपचार सुरु असतांना पतीचा मृत्यू झाला. याप्रकरणी साक्री पोलिसात गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## जागा करारानेे/भाड्याने देणे आहे

शासकीय/निमशासकीय कार्यालय, बँक, हॉस्पिटल,
फायनान्स कंपनी, क्लासेस, ग्राऊंड फ्लोअर १५०० स्के.फुट,
पहिला मजला १५०० स्के. फुट
पत्ता : चेअरमन, कृषि सहायक व पदोन्नत सेवक कर्मचारी सहकारी पतसंस्था म.धुळे.
४७, रेऊ नगर नकाणे रोड महालक्ष्मी फरसाण समोर देवपूर धुळे
मो.नं.७५८८३१९५१३ (सचिव)

**सचिव**
**कृषि सहायक व पदोन्नत सेवक कर्मचारी सहकारी पतसंस्था म.धुळे**

## ५९ वे पुण्यस्मरण



**कै.सौ.कासूबाई मोतीराम महाजन**

मु.शिरपूर जि.धुळे (स्वर्गवास:११/४/१९६६)

तुम्ही अपार कष्ट करुन सर्व मुलांना, नातूंना सुखी केले. तुमच्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली! तुमच्या आत्म्यास चिरशांती लाभो, हीच प्रभूचरणी प्रार्थना!

**✻ शोकाकुल ✻**

कृष्णा मोतीराम रोकडे (मुलगा)
जगन्नाथ मोतीराम रोकडे (मुलगा)
गं.भा.दर्याबाई पुंडलिकराव माळी (मुलगी)
प्रकाश पुंडलिकराव माळी (नातू)
रघुनाथ अर्जुन रोकडे (नातू)
पांडूरंग अर्जुन रोकडे (नातू)
नितीनचंद्र कृष्णा रोकडे (नातू)
बिपिनकुमार कृष्णा रोकडे (नातू)
हिरालाल जगन्नाथ रोकडे (नातू)
संजय जगन्नाथ रोकडे (नातू)
दिलीप मगनराव पाटील (नातू)

## टायटल व्हेरीफिकेशन नोटीस

तमाम जनतेस व सर्व हितसंबंधितांना तसेच सर्व बँका, पतपेढ्या, तथा इतर सर्व वित्तीय संस्थाना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन:-** तु.जि.धुळे, पो.तु.ता.धुळे पैकी धुळे म.न.पा. हद्दीतील मौजे वलावाडी ता.जि.धुळे येथील सर्व्हे क्रं. ८२/१+२ व ७७/१ब पैकी प्लॉट क्र.८५ ज्यासी क्षेत्र ३३१.२० चौ.मी. यांसी विस्तारित सिटी सर्व्हे क्र. १४०९ यांसी क्षेत्र ३३०.०० चौ.मी. ज्यासी चतु:सीमा पुढील प्रमाणे की,
पुर्वेस– ९ मीटर रस्ता, पश्चिमेस– ६ मीटर रस्ता,
दक्षिणेस– ६ मीटर रस्ता, उत्तरेस– प्लॉट क्र.८४.

येणेप्रमाणे वर्णनाच्या प्लॉट मिळकत ही श्री.मधुकर भगवान देशमुख रा.धुळे ह.मु.ऐरोली जि.ठाणे यांच्या मालकीची व कब्जे उपभोगातील मिळकत असून महसूल दप्तरी सिटी सर्व्हे उताऱ्यावर वर नमूद मिळकत धारक म्हणून त्यांचे नाव मालक व कब्जेदार सदरी लागलेले आहे. तसेच सदर मिळकतधारक यांनी वर नमूद मिळकत ही पूर्णपणे निर्वेध, निजोखमी असल्याचा भरंवसा देखील दिला आहे. सदर मिळकत आमच्या पक्षकार यांनी खरेदी करण्याचा तोंडी सौदा मिळकतधारक यांचेशी केलेला असून बयाणा रक्कम देखील अदा केलेली आहे. लवकरच आमचे पक्षकार सदर मिळकतीचे खरेदी खत करणार आहेत.

सबब सदर मिळकतीवर ज्या काही व्यक्ती/संस्था यांचा कोणताही हक्क, लाभ, अधिकार, दावा, मागणी, हितसंबंध, तसेच विक्री, अदलाबदल, भाडे, भाडेपट्टा, वहिवाट, परवाना, अभिहस्तांकन, गहाण, वारसाहक्क, भाडेपट्टा, मृत्युपत्र, करार, जप्ती, आरक्षण, किंवा उत्तराधिकार, बक्षीस, धारणाधिकार, विश्वस्त कब्जा, ताबा, तसेच कोणताही दावा, न्यायालयीन आदेश/हुकुमनामा, कंत्राट/करार, विकासननामा, देवाण–घेवाण, बेचेन–पत्र, आणि/अथवा स्वारस्य असलेले पतदार, आणि/अथवा लेंडर, समाविष्ट असलेले किंवा नसलेल्या व्यक्तींची संस्था, किंवा व्यक्तींची असोसिएशन, वित्तीय संस्था/वित्तीय बँका, कंपनी, स्वतंत्र व्यक्तीचा समावेश असलेल्या सर्व व्यक्तींनी त्यांचा ज्या कोणत्याही प्रकारचा हक्क असेल तो किंवा ज्या कोणत्याही मागणीच्या स्वरूपातील वर नमूद मिळकत किंवा वर नमूद मिळकतीचा कोणताही भाग किंवा त्याच्या हिश्यासंबंधी कोणताही आक्षेप असल्यास कृपया लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसोबत खालील नमूद पत्यावर सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०८ (आठ) दिवसाच्या आत लेखी आक्षेप/हरकती नोंदवाव्यात.

सदर मुदतीत कोणाचीही लेखी आक्षेप/हरकत न आल्यास वर नमूद मिळकत या निर्वेध व बोजा विरहित, हस्तांतरणीय आहे असे समजून वरीलप्रमाणे सदर मिळकत पणनयोग्य असल्याचा दाखला दिला जाईल. मग कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार चालणार नाही. व मुदतीनंतर येणाऱ्या तसेच वर्तमानपत्रात परस्पर प्रसिद्ध केलेल्या तसेच कागदपत्रांशिवाय आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

सदर जाहीर नोटीस आमचे पक्षकार यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून तसेच दाखवलेल्या कागदपत्रावरून प्रसिद्ध करण्यात येत आहे.

कळावे, ही टायटल व्हेरिफिकेशन नोटीस व जाहीर नोटीस.

**धुळे, दि.१०/०४/२०२४.**

**ॲड.विशाल शरद भट**
कार्यालय :– ३८, जानकी नगर, वाडीभोकर रोड, देवपूर, धुळे.
**मोबाईल क.९३२६१९८१७९**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना तसेच बँका, पतसंस्था, इतर वित्तीय संस्था, शासकीय, निमशासकीय संस्था व सावकार यांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन-** मौजे फागणे ग्रामपंचायत हद्दीतील गट नं.४९२ चे क्षेत्र १ हे ३४ आर पो.ख.०.३५ आर आकार रू.१.४४ पैसे यापैकी ला.ला. १ हे १० आर, पो.ख. ०.१० आर, यांस चर्तुसिमा गाव नकाशाप्रमाणे

येणे प्रमाणे मी मिळकतीचे मालक अमोल अशोकराव देशमुख रा.देवपूर, धुळे ता.जि.धुळे यांनी आमचे अशिल यांच्यासोबत सौदा केला आहे. सबब तमाम लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीत कोणाचेही कोणत्याही स्वरुपाचे जसे सौदा, करार, बक्षीस, अदलाबदल, गहाण, लिज, लिन, लिव्ह ॲण्ड लायसन्स, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार, मृत्युपत्र, वहिवाट, बोजे, ऋणभार, ताबा, आरक्षण, जप्ती, खरेदी–विक्री, न्यायिक व इतर प्रकरणे, अथवा इतर कोणत्याही स्वरुपाचे हक्क व अधिकार असतील तर त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत खालील नमूद पत्यावर पुराव्यानीशी लेखी हरकती नोंदवाव्यात. ०७ दिवसानंतर आलेल्या हरकती, लेखी पुराव्याशिवाय घेतलेल्या हरकती ग्राह धरण्यात येणार नाहीत. तसेच परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेल्या हरकती देखील विचारात घेतल्या जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत आमचे अशिलांनी खरेदी करण्यास कोणाचीही काही एक हरकत नाही, तसेच सदर मिळकत ही निर्बोज व हस्तांतरणीय आहे.

सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगितलेवरुन आमचेमार्फत प्रसिध्दीस दिले असे.

ठिकाण– धुळे, दिनांक– १०/०४/२०२४.

**ॲड.उमेश व्ही.मुसळे**
प्लॉट नं.३१, कृष्णा सिसोयिटी, एकता नगर, नकाणे रोड, देवपूर, धुळे–४२४००२.
**मो.नं.८४८३८७०६२८**
**८४८५८१६२८३**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, बँका, वित्तीय कंपन्या, पतसंस्था, ई. व सर्व सम्बंधितांना आमचे एक्सिस बँक लि.शाखा धुळे यांचे मार्फ़त सदरहु जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, कल्पना चंद्रकांत देवरे यांनी खलील नमूद मिळकत तारण देवून कर्ज मिळवण्यासाठी आमचे अशिलांकडे अर्ज कलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन-** तु.जि.धुळे, पो.तु.ता.साक्री पैकी मौजे साक्री येथील प्लॉट न.१३/अ, गट न.४१/४/५ यासी क्षेत्र १३५.५० चौ.मी. यासी यासी चतु:सीमा– प्लॉट न. १३/अ :
पुर्वेस– रोड,
पश्चिमेस– ओपन स्पेस,
दक्षिणेस– प्लॉट न.१३/ब,
उत्तरेस– गट न.४५.

कल्पना चंद्रकांत देवरे यांनी वर नमूद मिळकत ही शितल जहागीरदार साळुंखे यांचेकडून दि.१७.१२.२०११ रोजीचे रजि. खरेदीखत दस्त क्र. ४८७१/२०११ अन्वये विकत घेतलेली आहे. परंतु कल्पना चंद्रकांत देवरे यांचेकडून मूळ रजी. खरेदीखत दस्त क्र.४८७१/२०११ दि.१७.१२.२०११ यामधील मूळ पान नं.१४, १५, १६ आणि १७ हे गहाळ झालेले आहे/आढळून येत नाही.

सबब वरील मिळकतीबाबत इतर कोणाचेही कोणत्याही प्रकारे हक्क, अधिकार, हितसंबंध, हिस्सा, टाच, बोजा, वारसा हक्क, खरेदी, सौदा पावती, कोर्ट कचेरी, बक्षिसपत्र, गहाण, मृत्युपत्र, वैगेरे व्यवहार असल्यास त्यानी सदरहू जाहीर नोटिस प्रसिद्ध झाले पासून ७ दिवसाचे आत खलील नमूद पत्यावर लेखी हरकत कागदपत्रांच्या सत्यप्रत पुरव्यासह हरकत नोंदवावी. येणेप्रमाणे सदर मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकार हरकत न आल्यास उपरोक्त मिळकत निर्वेध व निर्बोज़ आहे असे समजण्यात येऊन आमचे अशिल कर्ज वितरणाची प्रक्रिया पूर्ण करतील, कळावे

धुळे, दि.१०/०४/२०२४.

**ॲड.सचिन जी.शर्मा**
२५, ''श्री सर्वेश्वर निवास'', राजवाडे नगर जवळ, नरेंद्र चौक, चाळीसगांव रोड, धुळे.
**मो.नं.९३२५०५६०००**
**७७९८०५६०००**

## ''झेड'' नमुना नोटीस

(महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७ पोट नियम (११(ड–१(एक)) अन्वये)

**स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतची नोटीस**

ज्या अर्थी खाली सही केलेला वसुली अधिकारी इंदिरा सहकारी बँक लि.धुळे (विसर्जीत)) महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये असून दि.६/६/२००२ रोजी मागणीची नोटीस बँकेचे ऋणक सौ/श्रीमती शकुंतलादेवी सुरेश कुमार धुडीयाल, रा.जी५, सम नं.५, कुमार नगर, साक्री रोड, तालुका– धुळे, जिल्हा– धुळे. यांना देऊन नोटीशीमध्ये नमूद केलेली रक्कम रु.४४१४८८/– (अक्षरी चार लाख एक्केचाळीस हजार चारशे अठ्ठ्यांशी रूपये मात्र) सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून आणि ऋणको याने रक्कम जमा करण्यास कसूर केली आहे. बँकेच्या वसुली अधिकाऱ्याने दि.२/९/२००२ रोजी जप्तीची नोटीस दिली असून पुढे निर्दिष्ट केलेली मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.

ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसूर केल्यामुळे ऋणकोला याप्रमाणे नोटीस देण्यात येत आहे आणि सर्व नागरिकांना, खाली निर्दिष्ट केलेल्या मालमत्तेचा खाली सही करणाऱ्याने त्याला/तीला महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७ पोट नियम (११(ड–१(एक) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार या ०१/०४/२०२४ दिवशी २०२४ या वर्षी प्रतीकात्मक (Symbolic) ताबा घेतला आहे.

विशेषकरून ऋणकोला आणि सर्व नागरिकांना याव्दारे सावध करण्यात येत आहे की, सदर मालमत्तेसंबधी कोणताही व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यास इंदिरा सह. बँक लि.धुळे (विसर्जीत) यांच्या बोज्याची रक्कम ५६८४९८/– आणि आज रोजी थकीत येणे कर्जाची रक्कम व त्या वरील होणारे व्याज याला अधिन राहावे लागेल.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

श्री/श्रीमती शकुंतलादेवी सुरेशकुमार धुंडीयाल,
रा.जी५, रूम न.५, कुमार नगर, साक्रीरोड, धुळे, तालुका– धुळे, जिल्हा–धुळे,
सर्वे क्र.११/१ पैकी, प्लॉट क्र.२७, गाव–महिंदळे, ता.धुळे, जि.धुळे.
चर्तु:सिमा– पुर्वेस– एसआरपी कॅम्प, पश्चिमेस– रस्ता,
दक्षिणेस– प्लॉट नं.२६, उत्तरेस– रस्ता.
ठिकाण– धुळे, दिनांक– ०१/०४/२०२४.

(शिक्का)
**(तुकाराम मखा कंखर)**
**विशेष वसुली अधिकारी**
**इंदिरा सहकारी बँक लि.धुळे (विसर्जीत)**

## ''झेड'' नमुना नोटीस

(महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७ पोट नियम (११(ड–१(एक)) अन्वये)

**स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतची नोटीस**

ज्या अर्थी खाली सही केलेला वसुली अधिकारी इंदिरा सहकारी बँक लि.धुळे (विसर्जीत)) महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये असून दि.२६/११/२००७ रोजी मागणीची नोटीस बँकेचे ऋणक सौ/श्रीमती शोभना जयवंत माळी, रा.मु.पो.गोंदुर, तालुका– धुळे, जिल्हा– धुळे. यांना देऊन नोटीशीमध्ये नमूद केलेली रक्कम रु.१४३२१३/– (अक्षरी एक लाख त्रेचाळीस हजार दोनशे तेरी रूपये मात्र) सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून आणि ऋणको याने रक्कम जमा करण्यास कसूर केली आहे. बँकेच्या वसुली अधिकाऱ्याने दि.१७/१२/२००७ रोजी जप्तीची नोटीस दिली असून पुढे निर्दिष्ट केलेली मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.

ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसूर केल्यामुळे ऋणकोला याप्रमाणे नोटीस देण्यात येत आहे आणि सर्व नागरिकांना, खाली निर्दिष्ट केलेल्या मालमत्तेचा खाली सही करणाऱ्याने त्याला/तीला महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७ पोट नियम (११(ड–१(एक) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार या ३१/०३/२०२४ दिवशी २०२४ या वर्षी प्रतीकात्मक (Symbolic) ताबा घेतला आहे.

विशेषकरून ऋणकोला आणि सर्व नागरिकांना याव्दारे सावध करण्यात येत आहे की, सदर मालमत्तेसंबधी कोणताही व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यास इंदिरा सह. बँक लि.धुळे (विसर्जीत) यांच्या बोज्याची रक्कम २०००००/– आणि आज रोजी थकीत येणे कर्जाची रक्कम व त्या वरील होणारे व्याज याला अधिन राहावे लागेल.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

श्री/श्रीमती जयवंत वामन माळी, रा.मु.पो.गोंदुर, तालुका– धुळे, जिल्हा–धुळे,
सर्वे क्र., मालमत्ता क्रमांक, गट क्र.३८८, गाव– गोंदुर, ता.धुळे, जि.धुळे.
चर्तु:सिमा– पुर्वेस– टेलरींग दुकान, पश्चिमेस– घर,
दक्षिणेस– रस्ता, उत्तरेस– घर.
ठिकाण– धुळे, दिनांक– ३१/०३/२०२४.

(शिक्का)
**(तुकाराम मखा कंखर)**
**विशेष वसुली अधिकारी**
**इंदिरा सहकारी बँक लि.धुळे (विसर्जीत)**

## ''झेड'' नमुना नोटीस

(महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७ पोट नियम (११(ड–१(एक)) अन्वये)

**स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतची नोटीस**

ज्या अर्थी खाली सही केलेला वसुली अधिकारी इंदिरा सहकारी बँक लि.धुळे (विसर्जीत)) महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये असून दि.२६/११/२००७ रोजी मागणीची नोटीस बँकेचे ऋणक सौ/श्रीमती मनिषा धुडकू भदाणे, रा.मु.पो.गोंदुर, तालुका– धुळे, जिल्हा– धुळे. यांना देऊन नोटीशीमध्ये नमूद केलेली रक्कम रु.१०७७९१३/– (अक्षरी दहा लाख सत्त्यातर हजार नऊशे तेरा रूपये मात्र) सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून आणि ऋणको याने रक्कम जमा करण्यास कसूर केली आहे. बँकेच्या वसुली अधिकाऱ्याने दि.७/२/२००८ रोजी जप्तीची नोटीस दिली असून पुढे निर्दिष्ट केलेली मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.

ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसूर केल्यामुळे ऋणकोला याप्रमाणे नोटीस देण्यात येत आहे आणि सर्व नागरिकांना, खाली निर्दिष्ट केलेल्या मालमत्तेचा खाली सही करणाऱ्याने त्याला/तीला महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७ पोट नियम (११(ड–१(एक) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार या ०३/०४/२०२४ दिवशी २०२४ या वर्षी प्रतीकात्मक (Symbolic) ताबा घेतला आहे.

विशेषकरून ऋणकोला आणि सर्व नागरिकांना याव्दारे सावध करण्यात येत आहे की, सदर मालमत्तेसंबधी कोणताही व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यास इंदिरा सह. बँक लि.धुळे (विसर्जीत) यांच्या बोज्याची रक्कम १०७७९१३/– आणि आज रोजी थकीत येणे कर्जाची रक्कम व त्या वरील होणारे व्याज याला अधिन राहावे लागेल.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

श्री/श्रीमती सौ.मनिषा धनंजय भदाणे, रा.मु.पो.गोंदुर,
तालुका– धुळे, जिल्हा–धुळे,
सर्वे क्र./मालमत्ता क्र., गट क्र.२६५, गाव–गोंदुर, ता.धुळे, जि.धुळे.
चर्तु:सिमा– पुर्वेस– घर, पश्चिमेस– घर,
दक्षिणेस– रस्ता, उत्तरेस– घराची मागील बाजू.
ठिकाण– धुळे, दिनांक– ०३/०४/२०२४.

(शिक्का)
**(तुकाराम मखा कंखर)**
**विशेष वसुली अधिकारी**
**इंदिरा सहकारी बँक लि.धुळे (विसर्जीत)**

## ''झेड'' नमुना नोटीस

(महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७ पोट नियम (११(ड–१(एक)) अन्वये)

**स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतची नोटीस**

ज्या अर्थी खाली सही केलेला वसुली अधिकारी इंदिरा सहकारी बँक लि.धुळे (विसर्जीत)) महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये असून दि.२७/१२/२००७ रोजी मागणीची नोटीस बँकेचे ऋणक सौ/श्रीमती पुष्पाबाई शालिक चौधरी, रा.मु.पो.नरडाणा, पंचायत समिती जवळ, नरडाणा, तालुका– शिंदखेडा, जिल्हा– धुळे. यांना देऊन नोटीशीमध्ये नमूद केलेली रक्कम रु.२१७५९२/– (अक्षरी दोन लाख सतरा हजार पाचशे ब्यान्नव रूपये मात्र) सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून आणि ऋणको याने रक्कम जमा करण्यास कसूर केली आहे. बँकेच्या वसुली अधिकाऱ्याने दि.२/२/२००८ रोजी जप्तीची नोटीस दिली असून पुढे निर्दिष्ट केलेली मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.

ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसूर केल्यामुळे ऋणकोला याप्रमाणे नोटीस देण्यात येत आहे आणि सर्व नागरिकांना, खाली निर्दिष्ट केलेल्या मालमत्तेचा खाली सही करणाऱ्याने त्याला/तीला महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७ पोट नियम (११(ड–१(एक) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार या ०३/०४/२०२४ दिवशी २०२४ या वर्षी प्रतीकात्मक (Symbolic) ताबा घेतला आहे.

विशेषकरून ऋणकोला आणि सर्व नागरिकांना याव्दारे सावध करण्यात येत आहे की, सदर मालमत्तेसंबधी कोणताही व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यास इंदिरा सह. बँक लि.धुळे (विसर्जीत) यांच्या बोज्याची रक्कम १५००००/– आणि आज रोजी थकीत येणे कर्जाची रक्कम व त्या वरील होणारे व्याज याला अधिन राहावे लागेल.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

श्री/श्रीमती शालीक हिरामण चौधरी, पुष्पा शालीक चौधरी,
रा.मु.पो.नरडाणा, तालुका– शिंदखेडा, जिल्हा–धुळे,
सर्वे क्र.,गट क्र., मालमत्ता क्र., १७८०, गाव– नरडाणा, ता.शिंदखेडा, जि.धुळे.
चर्तु:सिमा– पुर्वेस– रस्ता, पश्चिमेस– ,
दक्षिणेस– घर, उत्तरेस– .
ठिकाण– धुळे, दिनांक– ०३/०४/२०२४.

(शिक्का)
**(तुकाराम मखा कंखर)**
**विशेष वसुली अधिकारी**
**इंदिरा सहकारी बँक लि.धुळे (विसर्जीत)**

## ''झेड'' नमुना नोटीस

(महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७ पोट नियम (११(ड–१(एक)) अन्वये)

**स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतची नोटीस**

ज्या अर्थी खाली सही केलेला वसुली अधिकारी इंदिरा सहकारी बँक लि.धुळे (विसर्जीत)) महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये असून दि.२६/११/२००७ रोजी मागणीची नोटीस बँकेचे ऋणक सौ/श्रीमती सुमित्रा सखाराग गावीत, रा.४०, मयुर कॉलनी, देवपूर, धुळे. तालुका– धुळे, जिल्हा– धुळे. यांना देऊन नोटीशीमध्ये नमूद केलेली रक्कम रु.१७८३६५२/– (अक्षरी सतरा लाख त्र्यांशी हजार सहाशे बाबन्न रूपये मात्र) सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून आणि ऋणको याने रक्कम जमा करण्यास कसूर केली आहे. बँकेच्या वसुली अधिकाऱ्याने दि.११/१२/२००७ रोजी जप्तीची नोटीस दिली असून पुढे निर्दिष्ट केलेली मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.

ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसूर केल्यामुळे ऋणकोला याप्रमाणे नोटीस देण्यात येत आहे आणि सर्व नागरिकांना, खाली निर्दिष्ट केलेल्या मालमत्तेचा खाली सही करणाऱ्याने त्याला/तीला महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७ पोट नियम (११(ड–१(एक) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार या ०३/०४/२०२४ दिवशी २०२४ या वर्षी प्रतीकात्मक (Symbolic) ताबा घेतला आहे.

विशेषकरून ऋणकोला आणि सर्व नागरिकांना याव्दारे सावध करण्यात येत आहे की, सदर मालमत्तेसंबधी कोणताही व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यास इंदिरा सह. बँक लि.धुळे (विसर्जीत) यांच्या बोज्याची रक्कम १०,००,०००/– आणि आज रोजी थकीत येणे कर्जाची रक्कम व त्या वरील होणारे व्याज याला अधिन राहावे लागेल.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

श्री/श्रीमती ठाकूर होडल्या गावीत, रा.४०, मयुर कॉलनी, देवपूर, धुळे,
तालुका– धुळे, जिल्हा–धुळे,
सर्वे क्र.६६ पैकी, प्लॉट क्र.६६, गाव–वलवाडी, ता.धुळे, जि.धुळे.
चर्तु:सिमा– पुर्वेस– प्लॉट नं.६५, पश्चिमेस– प्लॉट नं.६७,
दक्षिणेस– प्लॉट नं.५२, उत्तरेस– रस्ता.
ठिकाण– धुळे, दिनांक– ०३/०४/२०२४.

(शिक्का)
**(तुकाराम मखा कंखर)**
**विशेष वसुली अधिकारी**
**इंदिरा सहकारी बँक लि.धुळे (विसर्जीत)**

## ''झेड'' नमुना नोटीस

(महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७ पोट नियम (११(ड–१(एक)) अन्वये)

**स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतची नोटीस**

ज्या अर्थी खाली सही केलेला वसुली अधिकारी इंदिरा सहकारी बँक लि.धुळे (विसर्जीत)) महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये असून दि.२७/१२/२००८ रोजी मागणीची नोटीस बँकेचे ऋणक सौ/श्रीमती मंजुलाबाई सुरेश वसावे, रा.३७, संत्त सेवादास नगर, चक्करबर्डी रोड, धुळे, तालुका– धुळे, जिल्हा– धुळे. यांना देऊन नोटीशीमध्ये नमूद केलेली रक्कम रु.९४६३२/– (अक्षरी चौऱ्यान्नव हजार सहाशे बातीस रूपये मात्र) सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून आणि ऋणको याने रक्कम जमा करण्यास कसूर केली आहे. बँकेच्या वसुली अधिकाऱ्याने दि.२६/०५/२०११ रोजी जप्तीची नोटीस दिली असून पुढे निर्दिष्ट केलेली मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.

ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसूर केल्यामुळे ऋणकोला याप्रमाणे नोटीस देण्यात येत आहे आणि सर्व नागरिकांना, खाली निर्दिष्ट केलेल्या मालमत्तेचा खाली सही करणाऱ्याने त्याला/तीला महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७ पोट नियम (११(ड–१(एक) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार या ०३/०४/२०२४ दिवशी २०२४ या वर्षी प्रतीकात्मक (Symbolic) ताबा घेतला आहे.

विशेषकरून ऋणकोला आणि सर्व नागरिकांना याव्दारे सावध करण्यात येत आहे की, सदर मालमत्तेसंबधी कोणताही व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यास इंदिरा सह. बँक लि.धुळे (विसर्जीत) यांच्या बोज्याची रक्कम ६०,०००/– आणि आज रोजी थकीत येणे कर्जाची रक्कम व त्या वरील होणारे व्याज याला अधिन राहावे लागेल.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

श्री/श्रीमती सौ.मंजुलाबाई सुरेश वसावे,
रा.३७, संत्त सेवादास नगर, चक्करबर्दी रोड, धुळे, तालुका– धुळे, जिल्हा–धुळे,
सर्वे क्र.५२९/१ब१ पैकी, प्लॉट क्र.तुकडा नं.६२, गाव–धुळे, ता.धुळे, जि.धुळे.
चर्तु:सिमा– पुर्वेस– प्लॉट नं.६३ व ६४, पश्चिमेस– प्लॉट नं.६१ व ६२,
दक्षिणेस– रस्ता, उत्तरेस– रस्ता.
ठिकाण– धुळे, दिनांक– ०३/०४/२०२४.

(शिक्का)
**(तुकाराम मखा कंखर)**
**विशेष वसुली अधिकारी**
**इंदिरा सहकारी बँक लि.धुळे (विसर्जीत)**

## ''झेड'' नमुना नोटीस

(महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७ पोट नियम (११(ड–१(एक)) अन्वये)

**स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतची नोटीस**

ज्या अर्थी खाली सही केलेला वसुली अधिकारी इंदिरा सहकारी बँक लि.धुळे (विसर्जीत)) महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये असून दि.२६/११/२००७ रोजी मागणीची नोटीस बँकेचे ऋणक सौ/श्रीमती सुमित्रा सखाराग गावीत, रा.४०, मयुर कॉलनी, देवपूर, धुळे. तालुका– धुळे, जिल्हा– धुळे. यांना देऊन नोटीशीमध्ये नमूद केलेली रक्कम रु.१७८३६५२/– (अक्षरी सतरा लाख त्र्यांशी हजार सहाशे बाबन्न रूपये मात्र) सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून आणि ऋणको याने रक्कम जमा करण्यास कसूर केली आहे. बँकेच्या वसुली अधिकाऱ्याने दि.११/१२/२००७ रोजी जप्तीची नोटीस दिली असून पुढे निर्दिष्ट केलेली मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.

ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसूर केल्यामुळे ऋणकोला याप्रमाणे नोटीस देण्यात येत आहे आणि सर्व नागरिकांना, खाली निर्दिष्ट केलेल्या मालमत्तेचा खाली सही करणाऱ्याने त्याला/तीला महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७ पोट नियम (११(ड–१(एक) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार या ०३/०४/२०२४ दिवशी २०२४ या वर्षी प्रतीकात्मक (Symbolic) ताबा घेतला आहे.

विशेषकरून ऋणकोला आणि सर्व नागरिकांना याव्दारे सावध करण्यात येत आहे की, सदर मालमत्तेसंबधी कोणताही व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यास इंदिरा सह. बँक लि.धुळे (विसर्जीत) यांच्या बोज्याची रक्कम १०,००,०००/–, १०,००,०००/– आणि आज रोजी थकीत येणे कर्जाची रक्कम व त्या वरील होणारे व्याज याला अधिन राहावे लागेल.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

श्री/श्रीमती ठाकूर होडल्या गावीत, रा.४०, मयुर कॉलनी, देवपूर, धुळे,
तालुका– धुळे, जिल्हा–धुळे,
सर्वे क्र.६६ पैकी, प्लॉट क्र.६४ व ६५, गाव–वलवाडी, ता.धुळे, जि.धुळे.
चर्तु:सिमा– पुर्वेस– प्लॉट नं.६३ व ६४, पश्चिमेस– प्लॉट नं.६५ व ६६,
दक्षिणेस– रस्ता, उत्तरेस– रस्ता.
ठिकाण– धुळे, दिनांक– ०३/०४/२०२४.

(शिक्का)
**(तुकाराम मखा कंखर)**
**विशेष वसुली अधिकारी**
**इंदिरा सहकारी बँक लि.धुळे (विसर्जीत)**

## ''झेड'' नमुना नोटीस

(महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७ पोट नियम (११(ड–१(एक)) अन्वये)

**स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतची नोटीस**

ज्या अर्थी खाली सही केलेला वसुली अधिकारी इंदिरा सहकारी बँक लि.धुळे (विसर्जीत)) महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये असून दि.२६/११/२००७ रोजी मागणीची नोटीस बँकेचे ऋणक सौ/श्रीमती आशाबाई मनिलाल पाटील, रा.२०९, साईकृपा सोसा. साक्रीरोड, धुळे. तालुका– धुळे, जिल्हा– धुळे. यांना देऊन नोटीशीमध्ये नमूद केलेली रक्कम रु.४०१४६६/– (अक्षरी चार लाख एक हजार चारशे सहासष्ट रूपये मात्र) सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून आणि ऋणको याने रक्कम जमा करण्यास कसूर केली आहे. बँकेच्या वसुली अधिकाऱ्याने दि.१७/१२/२००७ रोजी जप्तीची नोटीस दिली असून पुढे निर्दिष्ट केलेली मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.


ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसूर केल्यामुळे ऋणकोला याप्रमाणे नोटीस देण्यात येत आहे आणि सर्व नागरिकांना, खाली निर्दिष्ट केलेल्या मालमत्तेचा खाली सही करणाऱ्याने त्याला/तीला महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७ पोट नियम (११(ड–१(एक) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार या ३१/०३/२०२४ दिवशी २०२४ या वर्षी प्रतीकात्मक (Symbolic) ताबा घेतला आहे.

विशेषकरून ऋणकोला आणि सर्व नागरिकांना याव्दारे सावध करण्यात येत आहे की, सदर मालमत्तेसंबधी कोणताही व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यास इंदिरा सह. बँक लि.धुळे (विसर्जीत) यांच्या बोज्याची रक्कम ३०,०००/–, १५००००/– आणि आज रोजी थकीत येणे कर्जाची रक्कम व त्या वरील होणारे व्याज याला अधिन राहावे लागेल.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

श्री/श्रीमती धनराज उत्तम पाटील, रा.२०९, साईकृपा सोसायटी, साक्रीरोड, धुळे,
तालुका– धुळे, जिल्हा–धुळे,
सर्वे क्र./गट क्र.८४ पैकी, प्लॉट क्र.२०९, गाव–महिंदळे, ता.धुळे, जि.धुळे.
चर्तु:सिमा– पुर्वेस– १+२ अबकड, प्लॉट नं.१९५, पश्चिमेस– रस्ता,
दक्षिणेस– प्लॉट नं.२०८, उत्तरेस– रस्ता.
ठिकाण– धुळे, दिनांक– ३१/०३/२०२४.

(शिक्का)
**(तुकाराम मखा कंखर)**
**विशेष वसुली अधिकारी**
**इंदिरा सहकारी बँक लि.धुळे (विसर्जीत)**





धुळे- भगवान झुलेलाल जयंती चेट्रीचंड्र दिनानिमित्त साक्री रोडवरील पूज्य सिंधी जनरल पंचायत ट्रस्ट व भगवान झुलेलाल मंदिर ट्रस्ट यांच्यातर्फे आयोजित रक्तदान शिबिरात उपस्थित गुलशन उदासी, प्रकाश छेतिया, सुरेश कुंदनानी, भावेश दंडवानी, राजेश वालेचा, निलेश कटारिया, निखिल मनवाणी, राजकुमार गुरुबक्षानी, उमेश दंडवाणी, किशोर डियालानी आदी मान्यवर उपस्थित होते.

## बोराडी-मालकातर रस्त्यावर अवैध बिअरसाठा जप्त; चालक फरार

**शिरपूर, दि.१० (का.प्र.)- तालुक्यातील मालकातर ते बोराडी गावादरम्यान बुडकी शिवारात एका महिंद्रा बॉलेरो पिकअपमधून अवैध बिअरसाठा राज्य उत्पादन शुल्क विभागाने जप्त केला. आठ एप्रिलला रात्री ही कारवाई करण्यात आली. संशयित चालक फरार असून त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.**

राज्य उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक डी.पी.नेहूल, दुय्यम निरीक्षक ए.सी. मानकर मध्यप्रदेश राज्यालगत सीमावर्ती भागात गस्त घालत असतांना त्यांना बिअरच्या अवैध वाहतुकीबाबत माहिती मिळाली. त्यांनी रात्रीच्या वेळी बुडकी शिवारात मालकात्तर-बोराडी रस्त्यावर सापळा रचला. समोरून येणाऱ्या संशयित वाहन (एमएच ४३ एन ०७९५) ला थांबविण्याच्या इशारा केला. चालकाने भरधाव वेगाने पळून जात बुडकी गावाजवळ चिंचपाणी फाट्यावर रस्त्याच्या कडेला वाहन उभे करून अंधाराचा फायदा घेऊन पळ काढला. वाहनाची तपासणी केली असता पॉवर कूल बियर (मध्यप्रदेश राज्यात निर्मिती व विक्रीकरिता असलेले) ५०० मी.लि. क्षमतेच्या एकूण १४४० पत्री टीन (कॅन) (६० बॉक्स) व महिंद्र बोलेरो चार चाकी वाहनासह एकूण रु. ५,५८,४००/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. संशयितांविरोधात शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. निरीक्षक देविदास नेहूल, दुय्यम निरीक्षक ए.सी. मानकर, बी.एस. चौथवे, ए.बी. निकुंभे, जवान केतन जाधव, गोरख पाटील, प्रशांत बोरसे, वाहन चालक रवींद्र देसले यांच्या पथकाने ही कारवाई केली.

**बंगला विकणे आहे**

प्लॉट 5000 sq.ft. बांधकाम 3000 स्क्वे.फूट R.C.C.
प्लॉट नं.४०, सम्राटनगर, जमनागिरी रोड, धुळे
किंमत : २.२५ cr.
बंगल्यावर अधिकृत परवानगी मोबाईल टॉवर, मासिक भाडे- २०,०००/-
२४ तास पाणी, स्वतंत्र विहीर
-: संपर्क :-
9822574117

## पान २ वरुन

### गल्लीत गर्जना, दिल्लीत मुजरा

कळल्यानंतर आपल्या पक्षाच्या सोबत ठाकरे हे नाव हवेच हवे या हेतूने त्यांनी राज ठाकरे यांना गोंजारण्याचे ठरविले. त्यांच्या मागे ईडी वगैरेचा ससेमिरा लावला नाही हे ठीक आहे. तरीही राज ठाकरे यांना भीती ईडीची होतीच. त्यामुळे ते दिल्लीत केंद्रीय गृहमंत्र्यांच्या निवासस्थानी पोहोचले तिथे त्यांना वाट बघावी लागली तरीही ती त्यांनी बघितली. तिथे त्यांच्यात काय बोलणं झाली या संदर्भात फारशी काही माहिती कुणाला नाही मात्र गुढी पाडव्याच्या मेळाव्यात आपण आपली भूमिका जाहीर करू असे त्यांनी पत्रकारांना सांगितले होते त्यानुसार गुढीपाडवा मेळाव्यात नेहमीच्या शैलीत न बोलता त्यांनी युतीला बिनशर्त पाठिंबा आपण देत असल्याचे घोषित केले. त्यावर खूप राजकीय प्रतिक्रिया येत असल्या तरी त्याची मीमांसा आम्ही येथे करू इच्छित नाही कारण की त्या त्या राजकीय नेत्यांची मते आहेत आणि भूमिका राज ठाकरे यांची आहे. परंतु मराठीचा स्वाभिमान म्हणून, महाराष्ट्राचा स्वाभिमान म्हणून महाराष्ट्राच्या जनतेला त्यांची भूमिका आवडलेली नाही. गल्लीत गर्जना दिल्लीत मुजरा अशी त्यांची अवस्था झाली आहे. बऱ्याच लोकांनी डरकाळी फोडणारा वाघ म्हातारा झाला म्हणून शिकार न मिळाल्याने त्याच्यावर गवत खाण्याची पाळी आली असेही म्हटले आहे.

एक बाब उघड आहे की, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस सत्तेतील प्रमुख पक्षाने फोडल्यानंतर महाराष्ट्रात जे राजकारण नासले. त्याचा परिणाम जनमानसावर प्रचंड पडला. सामान्य विवेकी माणसाला सेना आणि राष्ट्रवादी फोडल्याची घटना मुळीच आवडली नाही. जरी एकनाथ शिंदे आणि अजित पवार हे बहुजनातील असले तरी त्यांच्या मागे धावत जाऊन आपली ससेहोलपट करून घ्यायची नाही असेच महाराष्ट्रातील जनतेने मनोमनी ठरविलेले दिसते त्याचे प्रत्यंतर अनेक ठिकाणी अनेक वेळा आलेले आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांना महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात प्रचंड प्रतिसाद आणि सहानुभूती मिळाली. पुढे मिळणार आहे. त्यामुळे त्यांच्या दूर जाऊन पुन्हा त्यांना समर्थन देणे शक्य नसल्याने राज ठाकरे यांनी विद्यमान सत्ते सोबत राहण्याचे ठरविले. त्याचा परिणाम भविष्यात असा होईल की त्यांचे राजकीय अस्तित्व संपुष्टात येईल असा राजकीय विश्लेषकांचा होरा आहे. यात पुष्कळसे तथ्य असल्याचे आजच्या परिस्थितीवरून दिसते. तसेही परिवारात भावभावांचे कधी जमत नाही तसे ठाकरे घराण्यामध्ये सुद्धा दोन भावात सूत जमले नाही. त्यांनी वेगवेगळे मार्ग तयार केले आणि स्वीकारले. मात्र त्यामुळे महाराष्ट्राचे नुकसान आपण करीत आहोत याचे भान दुर्दैवाने राज ठाकरे यांनी ठेवले नाही असे म्हणण्याची वेळ आलेली आहे. ते तटस्थ राहिले असते नेहमीप्रमाणे त्यांचा बाणा त्यांनी जपला असता तर मराठी माणसाने त्यांना डोक्यावर घेतले असते पण आता वेळ निघून गेलेली आहे. त्यांची भूमिका चुकली आहे. काल परवापर्यंत दिल्लीतील जोड गोळी ही देशाला घातक आहे. त्यांचा नायनाट झाला पाहिजे अशी वक्तव्ये त्यांनी केली. ज्यांच्या संदर्भात केली त्यांच्याच कच्छपी ते आज लागलेले आहेत. हे त्यांचे, त्यांच्या पक्षाचे, त्यांच्या परिवाराचे दुर्दैव नसून महाराष्ट्राचे दुर्दैव आहे असेच म्हणावे लागेल.

## सेवा भारतीतर्फे अन्नपूर्णा योजनेचा शुभारंभ

**धुळे, दि.१०- देवगिरी प्रांतातील सेवाभारती धुळे शाखेच्या वतीने भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल रुग्णांच्या नातलगांसाठी मोफत जेवणाचे डबे वाटप करण्याच्या अन्नपूर्णा योजनेचा या महिन्यात नव्याने नुकताच शुभारंभ करण्यात आला.**

गत आठ वर्षे ही योजना दात्यांच्या सहाय्याने अव्याहतपणे सुरू होती काही कारणास्तव काही महिन्यांच्या कालखंडानंतर अन्नपूर्णा योजना सेवाभारतीद्वारे जोमाने सुरू करण्यात आली. यासाठी अधिष्ठाता यांची परवानगी घेण्यात आली व पंचवीस डबे वितरित करण्यात आले. जिल्हा शासकीय रुग्णालयात असंख्य रुग्ण दाखल होत असतात त्यांच्या सोबत असणाऱ्या नातलगांना या अन्नपूर्णा योजनेची मोठी मदत मिळत असते. या अन्नपूर्णा योजनेच्या शुभारंभ प्रसंगी सेवाभारती धुळे शाखा सचिव संध्या कुलकर्णी, सहसचिव अजय जोशी, कोषाध्यक्ष माधुरीताई शुक्ल, अन्नपूर्णा आयाम प्रमुख सतीश दीक्षित, स्वावलंबन आयाम प्रमुख भूषण देवळे व प्रितीताई जोशी तसेच रुग्ण साहित्य व्यवस्थापक लहू पाटील व जिल्हा रुग्णालयात रोज शहरातील विविध भागातून जमा केलेले डबे आणून देणारे रिक्षाचालक बडगुजर उपस्थित होते. यावेळी उपस्थित रुग्णांच्या नातलगांनी सेवाभारतीच्या अन्नपूर्णा योजनेबाबत कृतज्ञता व्यक्त केली.

**जागा विकणे आहे**

धुळे शहराच्या मध्यवर्ती असलेली 16x63 ची जागा त्वरित विकणे आहे. एजंट यांनी संपर्क करावा.
-: संपर्क :-
7744010511

## पान १ वरुन

### भविष्यातील पाणीटंचाई पाहता..

त्यावेळी पाटील बोलत होते. यावेळी शहादा पालिकेचे माजी लोकनियुक्त नगराध्यक्ष मोतीलाल पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती डॉ.सुरेश नाईक, प्रकाश पाटील, रमेश पाटील, साहेबराव गोसावी, शिवाजी पाटील आदींसह मान्यवर उपस्थित होते. यावेळी पाटील म्हणाले की, तालुक्यात विविध सामाजिक, सेवाभावी संस्था, शासनाचे विभाग यांच्यातर्फे गेल्यावर्षी जलसंधारणाची कामे करण्यात आली आहेत. परंतु अल्प पावसामुळे लहान मोठे धरणे तलाव कोरडे ठाक आहेत. परिणामी जल स्तर खालावला आहे. आपला परिसर कृषीप्रधान असुन संपूर्ण अर्थ व्यवस्था शेतीवर अवलंबून आहे. परंतु येणाऱ्या काळात पाणी टंचाई मोठ्या प्रमाणात आपल्या परिसरात देखील निर्माण होणार आहे. म्हणुन परिसरातील शेतकऱ्यांनी येणाऱ्या खरीप हंगामात विचार पूर्वक पीक पद्धती स्वीकारावी व आर्थिक नियोजन करणे गरजेचे आहे. येणाऱ्या काळात भीषण पाणीटंचाईचा सामना करावा लागू नये यासाठी नागरिकांमध्ये जनजागृती करणे गरजेचे आहे. तालुक्यात बहुतांश भागात बारमाही पिके घेतली जातात परंतु सध्याची परिस्थिती पाहता यंदा उन्हाळ्यात व खरीप हंगामात बागायती क्षेत्र घटणार असल्याची चिन्हे आहेत. कमी पाण्यातही भरघोस उत्पादन घेऊन आपली आर्थिक परिस्थिती अनेक शेतकऱ्यांनी बदलली आहे. सध्याची पाणीटंचाई व बोरवेलची खालावणारी पातळी पाहता शेतकऱ्यांनी ठिबक सिंचनाच्या वापर मोठ्या प्रमाणावर करणे गरजेचे आहे. सर्वच पीके ठिबक सिंचनावर घेता येत असून अधिकाधिक ठिबकचा वापर करून अल्प पाण्यात शेती करण्याचे नियोजन करावे. यामुळे कमी पाण्यातही बारमाही पिके घेण्याचे नियोजन होऊ शकते.

यावेळी कलमाडी येथील शेतकरी संदीप पाटील म्हणाले की, पश्चिम महाराष्ट्रात राजकीय नेत्यांनी मोठ्या प्रमाणावर पाण्याच्या प्रश्न सोडवला आहे. तेथे बहुतांश भागात बारमाही पिके घेतली जातात. तर या उलट आपल्या भागात दिवसेंदिवस पाणी परिस्थिती बिकट होत आहे. बारमाही पिके घेणारे शेतकरी कोरडवाहू होत चालले आहेत. विजेच्या प्रश्न मोठ्या प्रमाणावर आहे त्यामुळे शेतकऱ्यांनी स्वतः नियोजन करणे गरजेचे आहे. यावेळी हरी पाटील, मोतीलाल पाटील, दिलीप गांगुर्डे, डॉ.सुरेश नाईक यांसह मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. तसेच गुढीपाडवा निमित्त शेतकऱ्यांनी अल्प पाण्यात अधिकाधिक उत्पन्न घेऊन पाण्याच्या बचतीच्या संकल्प केला.

### तिघांना मध्यप्रदेश पोलिसांनी पकडले

तर इको गाडी सात लाखाची अशी किंमत धरण्यात आली. या तिघांविरुद्ध ८/२० एन.डी.पी.एस. कायद्या प्रमाणे गुन्हा नोंदवला आहे. तिघे संशयित आरोपी धुळे जिल्ह्यातील शिरपूर तालुक्यातील सांगवी पोलीस ठाण्या अंतर्गत येणाऱ्या व पळासनेर जवळ असलेल्या निलगिरी पाडा येथील आहेत. इंदौर येथे सदरचा गांजा नेला जात होता. यापूर्वी देखील त्यांनी नेला असल्याचे तस्करांनी सांगितले. बडवानीचे पोलीस अधीक्षक पुनीत गेहलोत, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अनिलकुमार पाटीदार, सेंधवा येथील एस.डी.पी.ओ. कमलसिंह चौहान यांच्या मार्गदर्शनाखाली सेंधवा ग्रामीणचे पोलीस निरीक्षक दिलीपकुमार पुरी यांच्यासह उपनिरीक्षक अशोक अहिरराव, ए.एस.आय.संजय पांडे, तरुण राठोड, विनोद मिणा, समरथ राठोड, दिलीप कनोज, वाहन चालक अलकेश यांनी या कारवाईत महत्वाची भूमिका बजावली.

### कमांडर राऊत उद्या धुळ्यात

राहावे, असे आवाहन जिल्हाध्यक्ष जाधव, ए.वाय. सोनवणे, उपाध्यक्ष धुळे गोरख माळी, जिल्हाध्यक्ष नंदुरबार जे.आर. सुर्यवंशी, सरचिटणीस भोजुसिंग गिरासे, कोषाध्यक्ष संजय पाटील व पदाधिकारी यांनी केले आहे.

**प्लॉटस्, शेती आणि फ्लॅटस् विकणे**

१) शहराच्या मध्यवर्ती भागात भव्य शॉपिंग मॉल, मल्टीप्लेक्स, हॉस्पीटलसाठी उपयुक्त प्लॉट.
२) अग्रवाल नगर, जी.बी. नगर, स्नेहनगर, राजवाडे नगर येथील प्लॉट.
३) ग्रेनाईट, मार्बल, बिल्डींग मटेरियल शोरुमसाठी पारोळा रोडटच प्लॉट विकणे आहे.
४) महावीर सोसायटी, सप्तश्रृंगी नगर, सुगंध नगर येथील प्लॉटस्.
५) साक्रीरोड टच शेती.
६) शहराच्या मध्यवर्ती भागात 2 BHK फ्लॅटस्, वल्लभनगर येथे 2 BHK आणि 1 BHK फ्लॅटस्.
७) वल्लभनगर येथे 3 BHK बंगलो.
८) स्टेशन रोडटच व मालेगाव रोडटच प्लॉटस्.
संपर्क :-डि.आर.प्रॉपर्टीज 9422289693

## पान १ वरुन

### माफीनामा सर्वोच्च न्यायालयाने फेटाळला

प्रतिज्ञापत्र सादर करत दुसऱ्यांदा माफी मागितली होती. मात्र, हा माफीनामा न्यायालयाने फेटाळला आहे.

दरम्यान, पतंजलीच्या दिशाभूल जाहिरातीच्या प्रकरणासंदर्भात इंडियन मेडिकल असोसिएशनने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर १७ ऑगस्ट २०२२ पासून सुनावणी सुरु आहे. यामध्ये पतंजलीच्या आयुर्वेदिक औषधांनी काही आजार बरे होत असल्याचा खोटा दावा केल्याचा आरोप यामध्ये करण्यात आला आहे.

### भाजपचा पराभव आवश्यक

वसावे, मोहन पाटील, युवक तालुकाध्यक्ष गेंद्या पावरा, विधानसभा अध्यक्ष सागर पावरा, व्ही.यू.पाटील, शिवसेनेचे भरतसिंह राजपूत, अत्तारसिंह पावरा, युवराज पाटील, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे ॲड.हिरालाल परदेशी, रणजीत पावरा, आशा गटप्रवर्तक संघटनेच्या अध्यक्षा मालती इंगळे, स्मिता दोरीक, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष दत्तू पाडवी, ॲड.संतोष पाटील, विभा जोगराणा आदि उपस्थित होते.

प्रतिभा शिंदे म्हणाल्या की, डॉ.विजयकुमार गावित यांच्या कुटुंबाने फक्त स्वत:चा विकास व्हावा यासाठी प्रयतक केले. मंत्री, खासदार आणि जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद अशा तीन पदांच्या माध्यमातून तीन खिडकी योजना राबवून फक्त स्वत:चे भले करुन घेतले. सहा हजार कोटी रुपयांच्या भ्रष्टाचाराचा आरोप डॉ.विजयकुमार गावितांवर आहे हे लक्षात ठेवा. अब की बार, भाजपको नही मिलेगा नंदुरबार असा निश्चय करुन सर्वांनी कामाला लागा. आपणच ॲड. गोवाल पाडवी आहोत असे समजून पक्ष आणि प्रचारकार्य झाले पाहिजे असे आवाहन त्यांनी केले.

आमदार ॲड.के.सी.पाडवी म्हणाले की, योजनांचा गवगवा गावित कुटुंबाकडून केला जातो. नंदुरबारसाठी दोन हजारांवर योजना आणल्या, प्रत्यक्षात चार ते पाच योजनांची पूर्तता झाली. मग बाकीच्या योजना, त्यांचा निधी कुठे गेला? ठक्करबाप्पा योजनेतून टक्केवारी घेऊन सरपंचांना काम देण्याचे काम कोणी केले? फक्त कंत्राटदारांना पोसून गोरगरीब आदिवासी युवकांना रोजगारापासून वंचित ठेवण्याचे पाप कोणी केले याचा हिशेब मतदारांकडून विचारला जाणार आहे.

### नाना पटोलेंच्या वाहनाला अपघात

पक्षाच्या नेत्यांना संपवून भाजपला निवडणूक जिंकायची आहे का? असा सवाल काँग्रेसचे प्रवक्ते अतुल लोंढे यांनी उपस्थित केला आहे. तसेच, नाना पटोलेंच्या गाडीला झालेला अपघात ही अत्यंत गंभीर घटना असून त्यांचा घातपात करण्याचा डाव होता का? अशी शंकाही अतुल लोंढेंनी व्यक्त केली आहे.

### शेकडो ग्रामपंचायतींमध्ये मतदानाचा जागर

ग्रामपंचायतीच्या गावातील जिल्हा परिषद शाळेवर विद्यार्थी, शासकीय कर्मचारी, बचतगट महिला, ग्रामस्थांनी यावेळी मी मतदान करणार अशी शपथ घेतली.

कार्यक्रमाच्या ठिकाणी रांगोळी स्पर्धा, चित्रकला, मेहंदी, मानवी साखळी इत्यादी जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात आले. तर मतदारांचे प्रबोधनासाठी पथनाट्य, भजनीमंडळ, कविता, नाटक, गाण्यांचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आयकॉन, कॅम्पस म्बेसेटर, शासकीय अधिकारी, कर्मचारी यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. सर्व ग्रामपंचायतीत स्वीप अंतर्गत जाहिरात फलक, सेल्फी पाईट लावण्यात आले होते. त्याचप्रमाणे प्रत्येक ग्रामपंचातीत स्थानिक बोलीभाषेतून मतदान करण्यास प्रोत्साहनपर १ हजार ७४१ पेक्षा जास्त रिल व्हिडीओ मार्फत एका मिनिटांचा माहितीपट सादर करण्यात आला. या मतदार जनजागृती उपक्रमांत ग्रामसेवक, शिक्षक, स्थानिक कलाकार, युवकांना सहभागी करुन घेण्यात आले.

नवमतदार, युवक तसेच स्मार्ट फोनचा वाढता वापर लक्षात घेऊन मतदारांना सक्षम करण्याच्या हेतूने प्रत्येक १०० कुटूंबासाठी ३ कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली होती. त्यातील तंत्रसक्षेही कर्मचाऱ्यांच्या नेतृत्वाखाली सकाळी १० ते दुपारी २ वाजेदरम्यान घरोघरी जावून दीड लाखापेक्षा जास्त व्होटर हेल्पलाईन पचे रजिस्ट्रेशन करण्यात आले. अशा रितीने ५ नाविण्यपूर्ण संकल्पनेतून धुळे जिल्ह्यात मतदार जनजागृतीपर कार्यक्रमास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.मतदार जनजागृती महारॅलीचा मुख्य कार्यक्रम सोनगीर ता.जि.धुळे येथील एन.जी. बागुल हायस्कूल संलग्न कनिष्ठ महाविद्यालय येथे संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत पवार, स्वीप उपक्रमाचे नोडल अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी संजय बागडे, तहसिलदार अरुण शेवाळे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी भाऊसाहेब अकलाडे, गणेश मोरे, ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक बी.ए. बोटे, गटविकास अधिकारी गणेश चौधरी, विठ्ठल घुगे (शिक्षण विस्तार अधिकारी), दिपाली देसले, सुजाता बोरसे (विस्तार अधिकारी व महिला बालकल्याण), सुरेखा देवरे (प्राथमिक शिक्षणाधिकारी व गट शिक्षण अधिकारी), उपशिक्षण अधिकारी तथा शिक्षण विस्तार अधिकारी श्री विभांडीक, डॉ.बळीराम चव्हाण, सौ.बी.ए. भामरे (शिक्षण विस्तार अधिकारी) सुनील बागुल (सोनगीर विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष) ग्रामसेवक ठाकरे, एच.एस. विसपुते, प्राचार्य, एन.जी. बागुल हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय सोनगीर आदि मान्यवर उपस्थित होते.

### दत्तात्रय शिंदेंना जामीन मंजूर

युक्तीवाद झाला. यावर आज तिघांचा जामीन न्यायालयाने मंजूर केला आहे. जामीन देतांना तीस हजारांचा बॉण्ड, पोलीस ठाण्यात हजेरी व साक्षीदारांवर दबाव आणू नये अशा अटी टाकण्यात आल्या आहेत. यावेळी संशयित आरोपींतर्फे ॲड. निलेश मेहता यांनी काम पाहिले.

### जिल्ह्यात ५० लक्ष वृक्ष लागवडीसाठी..

प्रोत्साहीत करावेत. तसेच वृक्षारोपणासाठी विभागांना देण्यात आलेले उद्दिष्ठ पूर्ण करण्यासाठी नियोजन करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्यात. उपजिल्हाधिकारी (रोहयो) मुंडावरे यांनी यावेळी पीपीटीद्वारे माहिती दिली. बैठकीस विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

### गुप्तांगावर मारल्याने तरुणाचा मृत्यू

ताडी विक्री बंद केली आहे वेड्या... याचा राग येऊन अनिलने कुशालच्या गुप्तांगावर जोरात मारले अशातच कुशाल जागीच ठार झाला. हाणामारी होत असताना आकाश पाडवी, सागर पाडवी, विकास चौधरी यांनी भांडण सोडवण्याचा प्रयत्न केला असें पोलिसात नोंद आहे.

### ट्रकसह पकडली त्रेचाळीस लाखांची दारु

शिपाई सचिन कापडे यांच्या फिर्यादीवरून अज्जु खान रशिद खान (वय २७, रा.खडकपाणी ता.कसरावद जि.खरगोन राज्य मध्यप्रदेश), मोहंम्मद महेफुज मोहंम्मद लियाकत शहा, (वय २५, रा.पनाह नगर, बराई, मियाँ कापुरवा ता. कुंडा प्रतापगड, जि.प्रतापगड राज्य उत्तरप्रदेश) यांच्यासह पाच आरोपींच्या विरोधात गुन्हा नोंदविण्यात आला असून दोघांना पोलिसांनी अटक केली आहे. पुढील तपास पोलिस निरीक्षक शिवाजीराव बुधवंत यांच्या मार्गदर्शनाखाली तपास उपनिरीक्षक छगन चव्हाण करत आहेत.

### युवा मंचतर्फे रक्तदान शिबिर

करण्यात आली. सिव्हिल हॉस्पिटल नंदुरबार व जनकल्याण रक्तपेढीने रक्त संकलन केले. त्यांच्यातर्फे रक्तदात्या प्रति व आयोजकांप्रती आभार प्रदर्शन करण्यात आले. सिंधी समाज युवा मंच सदस्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. शिबिरास विविध राजकीय पक्षाच्या नेत्यांनी उपस्थिती देऊन रक्तदान महान दान कार्याबद्दल आयोजकांचे कौतुक केले. दरवर्षीप्रमाणे यंदाही उपक्रम सिंधी समाज युवा माझी तर्फे राबविण्यात आला. यावेळी कमल ठाकुर यांच्या परिवाराच्या चारही सदस्यांनी रक्तदान करुन आदर्श निर्माण केला. त्यांना प्रमाणपत्र व सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले.

२० वर्षापासून ग्राहकांचा विश्वास असणारे
श्री लॅण्ड डेव्हलपर्स घेऊन येत आहे..

**भक्ती नगर**

मासिक सुलभ हप्त्याने प्लॉट विक्री योजना

* योजनेची ठळक वैशिष्ट्ये *
* सदर प्लॉटस्‌ची योजना ही मुंबई आग्रा हायवेपासून अवघ्या २०० मिटर अंतराच्या आत धुळे एम.आय.डी.सी.समोर रानमळा रस्ता टच.
* प्लॉटची साईज : १२ X ६५ व ११ X ६५ व त्यापेक्षा मोठी साईज उपलब्ध.
* सदर योजनेची प्रवेश फी रु.५००/- असेल.
* एन.ए. व सनद झालेले प्लॉटस्.
* रोखीने व हप्त्याने खरेदीची सोय.
* वास्तुशास्त्राप्रमाणे डी मार्केटींग केलेले प्लॉटस्
* निसर्गरम्य वातावरणातील साईट.
* सर्वसामान्यांसाठी आपल्या बजेटमध्ये आपल्या पाल्यांसाठी चांगल्या गुंतवणुकीचा पर्याय.त्वरा करा!

-: संपर्क :-
श्री.सुभाष भगवान लोकरे श्री.स्वप्निल सुभाष लोकरे
ऑफिस :- २७०९, ग.नं.५, घड्याळवाली मस्जिद जवळ, धुळे
9011765188, 9823412718, (02562) 240109




बँकेच्या क्रेडीट कार्डवर EMI सुविधा उपलब्ध !
BAJAJ FINSERV HDB FINANCIAL SERVICES
0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.
नियम व अटी लागू*
फायनान्सला लागणारी कागदपत्रे: 1) पॅनकार्ड 2) आधार कार्ड 3) बँक पासबुक व चेक
56 वर्षापासून आपल्या सेवेत...
अधिकृत विक्रेते श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763
ak media- 238222

**पाहिजेत**
समर्थ होम अप्लायन्सेस
कंपनीकरिता मुला-मुलीची, स्त्री-पुरुषांची फिल्ड ऑफीसर, ट्रेनि मॅनेजरची आवशकता आहे, अनुभवाची आणि वयाची अट नाही, गाडी+राहणे फ्री
पगार = १०,००० ते २०,५००.
मो.नं. - 92090 20526, 98343 95881

**जागा विकणे आहे**
धुळे शहराच्या मध्यवर्ती असलेली 16x63 ची जागा त्वरित विकणे आहे. एजंट यांनी संपर्क करावा.
-: संपर्क :-
7744010511

**पाहिजेत**
सेल्समन - १ बाहेरगावी फिरस्ती कामाकरिता
सेल्स मॅनेजर - १
अर्जासह समक्ष भेटा!
वेळ स.११ ते १, संध्या.५-७
अशोका केमिकल वर्क्स
ई-६१, एमआयडीसी, अवधान,धुळे
9175068478

**विकणे आहे**
Activa-2008 RTO पासिंग व पूर्ण काम केलेली. अपेक्षित किंमत- २७०००/-
-: संपर्क :-
9423390451

**पाहिजेत**
रेडीमेड कापड दुकानासाठी हुशार व अनुभवी सेल्समन/हेल्पर पाहिजेत. आकर्षक पगार व इतर सवलती दिली जाईल.
ईश्वर गारमेन्टस्, धुळे
9423917461

**पाहिजेत**
दुध डेअरीचा अनुभव असलेला माणूस लावणे आहे. तसेच दुध डेअरीवर दुधाचे फॅट काढू शकणारा अनुभवी माणूस लावणे आहे. समक्ष भेटा!
महात्माजी स्वीटस्
ग.नं.४, खोलगल्ली, धुळे
9822447729

**पाहिजे**
क्लिनिकच्या फुलटाईम/पार्टटाईम कामासाठी प्रत्येकी एक मुलगा व मुलगी त्वरित लावणे आहे.
-: संपर्क :-
भावसार आयुर्वेद पंचकर्म क्लिनिक
बांबू गल्ली, फेटेवाले समोर, धुळे सकाळी ११ ते १ वेळेत प्रत्यक्ष भेटणे!
8408958987

**1BHK फ्लॅट भाड्याने देणे आहे**
शिवतीर्थ अपार्टमेंट, दिपआरती पेट्रोलपंप जवळ, मोहाडी रोड, धुळे
संपर्क
75888 37142

**पाहिजेत**
१) कॉम्प्युटर ऑपरेटर
२) सेल्समन-२ बाहेरगाव साठी
३) मदतनिस- माल वाटपासाठी
-: संपर्क :-
संजय मेडीकल्स्
गल्ली नं.२, धुळे

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-४००४११५, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०